**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५९ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १८९** **दिनांक – ०९/०९/२०२५**

**विभाग – आस्थापना विभाग**

---

प्रस्तावाचा विषय - अहिल्यानगर महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदानाबाबत.

--**--

ठराव – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी संप नोटीस देवुन दिवाळी सणानिमित्त कामगारांना सानुग्रह अनुदान/बोनस मिळणेबाबत मागणी केलेली होती.

त्यानुंषगाने मनपा प्रशासन व कामगार युनियनचे मा. पदाधिकारी यांचेमध्ये दिनांक १२/०८/२०२५ रोजी संयुक्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती, सदर संयुक्त बैठकीस मा. आयुक्त तथा प्रशासक, मा. उपायुक्त (सा), मा. प्र. मुख्य लेखाधिकारी, मा.सहा. आयुक्त, आस्थापना तसेच कामगार युनियनचे वतीने मा. अध्यक्ष, श्री. जितेंद्र लक्ष्मण सारसर, मा. श्री. बाबासाहेब मुदगल, सरचिटणीस मा. आनंदराव वायकर, व इतर मा.पदाधिकारी बैठकीस अपस्थित होते.

सदर संयुक्त बैठकीस सर्व समावेशक चर्चा होवुन खालीलप्रमाणे नमुद केलेनुसार सर्वानुमते निर्णय घेण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | युनियनची मागणी | बैठकीमधील निर्णय |
|---|---|---|
| १ | अहिल्यानगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त बोनस व सानुग्रह अनुदान मिळणे बाबत. | आस्थापना विभागाकडील सन २०२५-२०२६ वर्षाकरिता असलेली सानुग्रह अनुदानाची तरतुद रू. १कोटी ७५ लाख आहे, त्यामुळे मनपाची आर्थिक वर्षामध्ये कायम पात्र कर्मचारी तसेच परिविक्षाधीन कर्मचारी यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान म्हणुन प्रत्येकी रूपये ११,२५०/- इतका देणे बाबत घोषित करण्यात येवुन त्याबाबतचा प्रस्ताव मा. महासभा ( मा. प्रशासक ) यांचेकडे मान्यते करिता सादर करणेबाबतची कार्यवाही करावी. |

अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये सन २०२४-२०२५ मध्ये आसथापना कायम सुचीवरील कार्यरत असण-या कर्मचायांची अंदाजे संख्या १५५० इतकी आहे.अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सन २०२५-२०२६ या अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदाना करिता रक्कम रू. १ कोटी ७५ लाख इतकी रक्कम म्हणुन तरतुद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

अहिल्यानगर महानगरपलिका कामगार युनियन यांचेकडील जा.क्र.३५/श्रमिक २०२५ दिनांक २८/०७/२०२५ रोजीची संप नोटीसाच्या अनुषंगाने व संयुक्त बैठकीमधील इतिवृत्ताप्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त प्रत्येकी रूपये ११,२५० याप्रमाणे सानुग्रह आनुदान बाबत मा.महासभेच्या मान्यतेनंतर एकुण अंदाजे रूपये १,७४,३७,५००/- (अक्षरी रूपये एक कोटी चौ-याहत्तर लाख सदोतीस हजार पाचशे) इतका खर्च अपेक्षित होईल.

अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा. क्र. ३५/श्रमिक/ २०२५ दिनांक २८/०७/२०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने व संयुक्त बैठकीमधील इतिवृत्ताप्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिकेमधील पात्र कायम कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त प्रत्येकी रक्कम रूपये ११,२५०/- याप्रमाणे अनुदान देणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५९ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १९०** **दिनांक — ०९/०९/२०२५**

**विभाग — मोटर व्हे. विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय -** अहिल्यानगर महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी/अधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरणेकामी प्रतिपूर्ती योजनेचा लाभ देणेबाबत

--**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये मा. अधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी महानगरपालिकेकडे असणारी वाहन संख्या, वाहन चालक कमी असून महानगरपलिका वाहन वापरावर होणारा खर्च ( वाहन किंमत +इधंन खर्च + विमा + वाहन चालक वेतन+ मेन्टनंस खर्च इत्यादी ) तसेच भाडे पध्दतीने वाहने उपलब्ध केल्यास ( मासिक वाहन भाडे + इंधन खर्च ) येणारा खर्च याबाबत चर्चा होवून, महानगरपालिका वाहने व भाडोत्री वाहनांवर जादा खर्च होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

करिता मागील मा. स्थायी समिती ठराव क्र. ८० दि. २५/०१/२०१२, स्था. समिती ठराव क्र.१३६ दि. २३/१०/२०१३, स्था.स.ठ. क्र. २१ दि.२९/१२/२०१४ ठ.क्र. ०२ दि.०५/०७/२०१४ व महासभा ठ.क्र. २८ दि.३०/१२/२०१७ चे अनुषंगाने तसेच महानगरपालिका स्वायत संस्था असल्याने व महानगरपालिकेच्या हिताचे योग्य निर्णय घेणे क्रमप्राप्त असल्याने वाहन वापरा बाबतचे प्रतिपूर्ती योजना राबविणेस प्रस्तावातील अटी शर्ती नुसार ही सभा मंजूरी देत आहे.

लेखा परिक्षणातील आक्षेपां बाबत वरील प्रमाणे संबधीतांना कळविण्यात यावे तसेच सध्या स्वतः चे वाहन वापरत असलेले अधिकारी जसे की, जल अभियंता, सहा.आयुक्त यांची यापूर्वीची थकीत वाहन वापर प्रतिपूर्ती देणेस ही सभा मान्यता देत आहे.

यास्तव महानगरपालिकेचे पदधिकारी मा. महापौर, उपमहापौर, सभापती स्थायी समिती, विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, सभापती म.बा.क उपसभापती म.बा.क., व अधिकारी, मा.आयुक्त, उपायुक्त (सा.) उपायुक्त (कर), अतिरिक्त आयुक्त, सहाय्यक आयुक्त, मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक, जल अभियंता, शहर अभियंता, पाणी पुरवठा उप अभियंता, प्रकल्प अभियंता, वैद्यकीय आरोग्यधिकारी, सर्व प्रभाग अधिकारी यांना

स्वतः चे खाजगी वाहना वरील नमूद ठरावान्वये देय असल्याने त्यांचे वाहन प्रतिपूर्ती रक्कमेत खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

| **अ.न.** | **पदाधिकारी/अधिकारी पदनाम** | **वाहन वापर प्रतिपूर्ती रक्कम** | |
|---|---|---|---|
| | | **पेट्रोल वाहन (रूपये )** | **डिझेल वाहन (रूपये)** |
| १ | मा. महापौर | ५०,०००/- | ४०,०००/- |
| २ | मा. आयुक्त | ५०,०००/- | ४०,०००/- |
| ३ | मा.उपमहापौर | ३५,०००/- | ३०,०००/- |
| ४ | मा. सभापती, स्थायी समिती | ३५,०००/- | ३०,०००/- |
| ५ | मा. विरोधी पक्ष नेता | ३५,०००/- | ३०,०००/- |
| ६ | मा. सभागृह नेता | ३५,०००/- | ३०,०००/- |
| ७ | मा. सभापती,म.बा.क | ३५,०००/- | ३०,०००/- |
| ८ | मा. अतिरिक्त आयुक्त | ३०,०००/- | २५,०००/- |
| ९ | मा. मुख्य लेखाधिकारी | ३०,०००/- | २५,०००/- |
| १० | मा. मुख्य लेखापरिक्षक | ३०,०००/- | २५,०००/- |
| ११ | मा. जल अभियंता | ३०,०००/- | २५,०००/- |
| १२ | मा. शहर अभियंता | ३०,०००/- | २५,०००/- |
| १३ | वैद्यकीय आरोगयधिकारी | ३०,०००/- | २५,०००/- |
| १४ | मा.उपायुक्त (सा) | २५,०००/- | २२,०००/- |
| १५ | मा.उपायुक्त (कर) | २५,०००/- | २२,०००/- |
| १६ | उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग | २५,०००/- | २२,०००/- |
| १७ | मा. सहाय्यक आयुक्त | २५,०००/- | २२,०००/- |
| १८ | प्रकल्प अभियंता | २५,०००/- | २२,०००/- |
| १९ | सर्व प्रभाग अधिकारी | २०,०००/- | १८,०००/- |

सदरचे वाहन वापर प्रतिपूर्ती बाबत सर्वसाधारण नियमः

१) स्वतः चे वाहन वापर प्रतिपूर्ती ज्या पदाधिकारी/अधिकारी

२) कार्यालयीन कामकाजा करिता स्वतः चे वाहन वापरले बाबतचा दाखला, वाहन देय असलेल्या पदाधिकारी/अधिकारी यांनी स्वस्वाक्षरीने मा. आयुक्तांकडे देणे बंधनकारक राहिल.

३) अति. कार्यभार असल्यास मूळ आस्थापने प्रमाणे वर्ग/दर्जा राहणार असून त्यानुसार वाहन प्रतिपूर्ती योजना लागू राहिल.

४) वाहन प्रतिपूर्ती योजना लागू असून त्याप्रमाणे वाहन वापर नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत रक्कम वसूल पात्र राहिल.

५) वाहन प्रतिपूर्ती योजना लागू असताना कार्यालयीन कामकाजाकरिता बाहेरगावी ( मुंबई, पुणे, संभाजीनगर, नाशिक) प्रवास झाला तरी योजनेप्रमाणेच लाभ देय राहिल.

६) वाहन वापराबाबत महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागमार्फत कर्मचारी/ अधिकारी यांची माहिती आस्थापना विभागास कळविले जाईल. तदनंतर आस्थापना विभाग संबधीतांचा त्या- त्या महिन्याच्या वेतनामध्ये वाहन प्रतिपूर्ती रक्कम संबधीतांना अदा करेल,

वरील सदरचे वाहन वापर प्रतिपूर्ती बाबत सर्वसाधारण नियमास तसेच अहिल्यानगर मनपाचे मा.पदाधिकारी/अधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःचे वाहन वापरणेकामी प्रतिपूर्ती योजनेचा लाभ देणेबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मजूरी देत आहे.

-----------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५९ विषयाबाबतचे निर्णय**
**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १९१** **दिनांक — ०९/०९/२०२५**
**विभाग — पाणी पुरवठा विभाग**

---

प्रस्तावाचा विषय - अहिल्यानगर महानगरपलिका शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थे करिता तांत्रिक / अतंत्रिक कर्मचा-यांसह अभियंते उपलब्ध करणे कामासाठीचे कार्यालयीन खर्च ( बाह्ययंत्रणा ) या लेखाशिर्षका मधील तरतुद रक्कम संपुष्टात येत असलेली तरतुद वाढविणे बाबत.

--**-

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सन २०२५-२०२६ च्या संकल्पीय मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४२२ दिनांक १२/०३/२०२५ अन्वये मंजूर अर्थसंकल्पामध्ये पाणी पुरवठा विभागाकडील कार्यालयीन खर्च ( बाह्ययंत्रणा ) या लेखाशिर्षका अंतर्गत रूपये १.८० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थे करिता कार्यरत असलेला तांत्रिक/अतंत्रिक कर्मचारी वर्ग मोठया संख्येने कमी झालेला आहे.कर्मचा-याअभावी वितरण व्यवस्थेची व दुरूस्ती कामाची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली असल्याने शहर पाणी पुरवठा योजनेसह सर्व प्रभाग करिता तांत्रिक/अतंत्रिक कर्मचा-यांसह अभियंते कंत्राटी स्वरूपात बाह्य यंत्रणे कडून उपलब्ध करून घेण्यात येत आहे.

शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थे करिता तांत्रिक/अतंत्रिक कर्मचा-यासह अभियंते उपलब्ध करणे कामासाठी नियुक्त खाजगी एजन्सी यांचे दरमहा देयका पोटीचा खर्च हा या विभागाडील कार्यालयीन खर्च ( बाह्ययंत्रणा ) या लेखाशिर्षका अंतर्गत तरतूदी मधून खर्च करण्यात येत आहे.यासाठीची तरतुद ही रक्कम रू.१.८० काटी इतकी आहे.

परंतु विषयांकीत कामा पोटीचे मागील वर्षाचे म्हणजेच माहे सप्टेंबर २०२४,ऑक्टोबर २०२४ डिसेंबर २०२४ जानेवारी २०२५ व फेब्रुवारी २०२५ अशी एकुण ६ महिन्यांची बिले एप्रिल २०२५ मध्ये विभागास प्राप्त झाल्याने सदरची सर्व बिले चालू आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकीय तरतुदी मधून खर्च टाकण्यात आलेली आहे.

त्यामुळे कार्यालयीन खर्च ( बाह्ययंत्रणा ) या लेखाशिर्षका मधील तरतूद रक्कम रू.०१.८० कोटी मधून आज अखेर रक्कम रू.०१.५८ कोटी इतका खर्च झालेला असून रू.२१.०० लक्ष इतकीच तरतूद शिल्लक आहे. सदरहू कामापोटी ३१ मार्च २०२६ अखेर सुमारे रू.०२.४० कोटी वाढीव खर्च लागणार आहे.

त्यासाठी या विभागाकडील लेखाशिर्षकामध्ये शिल्लक असलेल्या तरतुदींमध्ये कपात करून विषयांकीत कामासाठी लेखाशिर्षक तरतुदीमध्ये वाढ करणे शक्य असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | लेखशिर्षक | सन २०२५-२६ करिताची तरतूद | माहे जुलै २०२५ अखेर शिल्लक | तपशिल | सन २०२५-२६ करिता करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | कार्यालयीन खर्च ( बाह्ययंत्रना ) | १.८० कोटी | २१.०० लक्ष | २.४० कोटी तरतुद वाढ करणे | ४.२० कोटी |
| २ | अमृत/नगरोत्थान राज्यस्तर पाणी पुरवठा योजना | १००.०० कोटी | १००.०० कोटी | २.४० कोटी तरतूद | ९९७.६० कोटी |

वरील प्रमाणे परिस्थिती विचारात घेता शहर पाणी पुरवठा योजने सह शहर पाणी वितरण व्यवस्थेतील पाणी पुरवठा विषयक दैनंदिन देखभाल व दुरूस्तीची कामे वेळच्या वेळी पूर्ण करून शहराचा पाणी पुरवठा सुरळीत/अबाधित ठेवणे आवश्यक व क्रमप्राप्त असल्याने विषयांकीत नमूद कामासाठी वरील नमूद तक्त्यातील अनुक्रमे १ ते २ या लेखाशिर्षक तक्त्यानुसार सन २०२५-२०२६ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास कार्यालयीन खर्च ( बाह्ययंत्रणा ) या लेखाशिर्षकामध्ये वाढ करणे व अमृत/नगरोत्थान राज्यस्तर पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षावरील तरतूद कमी करणेस मा. प्रशासकीय स्थायी समितीने केलेल्या शिफारसीस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५९ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १९२** **दिनांक – ०९/०९/२०२५**

**विभाग – प्रकल्प विभाग**

---

प्रस्तावाचा विषय - बुरूडगांव स.नं. ३४ या ठिकाणी मान्सुन शेड विकसीत करणे करीता मा महासभेची प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

--**-

ठराव – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत सदरचा प्रकल्प अहवाल अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई या संस्थेमार्फत तयार करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांनी रूपये १०,०९,४४,४७७/- च्या प्रकल्प अहवालास दिनांक २०/०५/२०२५ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

संदर्भिय शासन निर्णयान्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) २.० अंतर्गत अहिल्यानगर महानगरपिलकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर DPR मध्ये खालील प्रमाणे कामांचा समावेश आहे.

| SR.NO | Particulars | Unit | Existing Capacity available | Proposed Capacity | Proposed Amount in Rs. In SBM 2.0 |
|---|---|---|---|---|---|
| A | Compost plant | TDP | 80 | 40 | |
| 1 | Civil works | | | | |
| | Monsoon shed on existing windrow platform | Sqm | 0 | 2720.00 | 36387994.97 |
| | [68mx40m] | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Monsoon shed on exisiting tipping Platfrom [70mx42mx] | Spm | 0 | 2940.00 | 39598095.22 |
| 2 | Plant and Machinery | | | | |
| | Waste Shredder [15TPH] | Nos | 0 | 2 | 4023334.00 |
| | Biomass Briquetting plant[10TDP] | Nos | 0 | 1 | 2175000.00 |
| | Plastic Dust Remover [5TDP] | Nos | 0 | 1 | 550847.00 |
| | Sub- Total of A[A2+A2] | | | | 82735271.19 |
| B | Total Project Basic cost [A] | | | | 82735271.19 |
| C | Mjp Fess {1% of B, inclusive of GST] | | | | 827352.71 |
| D | PMC Fess of [2.55% of B | | | | 2109747.41 |
| E | GST | | | | |
| 1 | Civil Work [A1] | | | | 13677496.23 |
| 2 | Plant And Machinery [A2] | | | | 1214852.5 |
| 3 | PMC free [18% on D ] | | | | 379754.89 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| F | Total GST [E1+E2+E3] | | | | 15272103.62 |
| TC-1 | Total Project Cost of Soild Waste Management [B+C+D+F] | | | | 100944477.00 |

सदर DPR मधील वरील स्थापत्य कामांपैकी १) Monsoon shed on exsisting windrow platform [68mx40mx 2] Monsoon shed on exsiting Tipping Platform [70mx42m] ही कामे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी प्रकल्प विभागामार्फत करणेबाबात सूचित केले आहे. सदर कामाचे ई – निविदा प्रसिध्द करणेपूर्वी मा. शासनाने दिलेल्या प्रशासकीय मान्यते प्रमाणे प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगांव सर्व्हे नं. ३४ या ठिकाणी स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० मधील प्रशासकीय मान्यता प्राप्त DPR मधील कांमाची अंमलबजावणी करणेस तसेच सदरच्या मंजुर DPR नुसार नमुद तक्त्यामधील अ.क्र. ( A ) च्या स्थापत्य कामाचे [Monsoon shed] चे ई – निविदा प्रसिध्द करणेस व त्या कामी येणा-या खर्चास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

------------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका